# जलप्रपात आणि मी
## धाडस पहिले

मी विदर्भाच्या लहान खेड्यात, अहेरी गांवांत जन्म घेतला व तेथेच प्राथमिक शिक्षण झालं. तेव्हढी वर्षे तरी मी कधी वाहत्या पाण्यांत साधा पाय देखील घातला नवहता. तसे प्रसंग कमीच. परंतु गांवाजवळच्या प्राणहिता नदीच्या काठांवर आमची दहा एकर वडिलोपार्जित शेतं त्याकांळी असायची. त्याला तरी साठ वर्षे झालीत. दरवर्षी होणारी हुर्डा पार्टी किंवा वडिलांबरोबर त्यांच्या सायकलीच्या दांड्यावर डबलसीट बसून शेताच्या कामासाठी जायचे प्रसंग अनेकदां आले. परंतु, नदीत प्रवेश करण्याची संधी कधी मिळाली नाही. वडील नेहमी घाईतच असायचे. कुणाचा निरोप कुणाकडे पोचते करून आम्ही पुन्हा डब्बलसीट परत घरी येत असूं.

हायस्कूल शिक्षणासाठी मलासुध्दा इतर सख्ख्या व चुलत भावंडांप्रमाणे जिल्हाचे ठिकाण चंद्रपूरला पाठविण्यांत आले. बालाजी वॉर्डमध्ये मद्दीवार वाड्यांत आम्ही सात भावंडं व तीन जवळच्या नात्यांतली अशा नऊ-दहा समवयस्क मुलांनी शिक्षणासाठी सात वर्षे घालवली. थोरल्या काकांचा प्रभाकर अण्णा दहावीतच अर्धवट शिक्षण सोडून (होमसिक) अहेरीला परत गेला. त्यानंतर माझा चुलत भाऊ चिलयाच्या देखरेखीत आम्ही खूप खूप मजा केली. अर्थात शिक्षण सुध्दा योग्य रितीने चालू असायचे. अमृत मासिक वाचून निळीशाईच्या पुड्या शाळेत विद्यार्थ्यांना वाटल्या. गाणी, नाटकात भाग घेतला, बराच धांगडधिंगा केला.

आम्हां सर्वांच्या शिकवणीसाठी घोरपडे गुरुजी रोजच सायंकाळी दोन तासांसाठी येत असत. नंतर चंद्रपूरला त्यांनी स्वत:ची शाळा काढली, ती वाढत वाढत आतां तर एक मोठी इन्स्टिट्यूट झाली. घरकामास एक चंद्रा नांवाचा नोकर होता. स्वैपाकासाठी राजय्या, व चिलयाची विधवा आई आमची मुत्तम्मा काकू देखरेखीला असायच्या. त्यांचे राज्य म्हणजे एकदम टापटीप. व स्वैपाकांत हातखंडा. ओळीत बसलेल्या दहा वाढत्या वयाच्या विद्यार्थ्यांना क्रमाक्रमाने पण वेळेवर गरम गरम फुगलेल्या पोळ्या ताटांत घालणे ही एक प्रकारची कलाच. त्यात आमच्या काकू नंबर वन, अगदी सचिन तेंडुलकरची फेक सुध्दा कमीच वाटावी.

रम्य त्या मस्त आठवणी. कुणालाही हेवा वाटावे असं आमचं आयुष्य. सात वर्षे आम्ही अनेक उपद्व्याप केलेत. अंगणांत, हुतुतू, खो खो असायचेच, शिवाय सायंकाळी शाखा भरवायचे. पूर्णिमेच्या रात्री अंगणांतच भजनं, गाणी, भेंड्या असे. गरम भजी, किंवा दूध. पण बरेचदा कांहीच खा-पी नसे, तरीही सर्व आनंद तोच.

दर रविवारी आम्ही सर्व मद्दीवार वाडा मधील मुले, आपापल्या सायकलीने आठवड्याचे कपडे धुण्याचे निमित्त करून चंद्रपूर गांवापलिकडच्या झरपट नदीत वा पडोली पुलाजवळ पोहायला जात असूं. मी तेथे पोहण्याची बरीच प्रॅक्टिस केली. शिवाय, चंद्रपूरच्या आझाद बागेत नवीनच पोहण्याचा तलाव बांधला. तेथे पोहायला शिकवायचे. तेथेच माझे पहिले पोहणे व नंतर आठ फूट उंच फळीवरून डाइव्ह (उडी) करायला तेथेच शिकलो.

दर आठ, दहा दिवसांतून आमच्या चुलत्यांपैकी कुणी घरच्या जुन्या फोर्डने मद्दीवार वाड्यात व्यापारसंबंधात बोलणी करण्यासाठी यायचे. आम्ही तेवढे दोन दिवस हशहुश शांतता बाळगायचो. आमचे मद्दीवार कुटुंम्ब त्या काळी फॉरेस्ट कॉन्ट्रॅक्टरच्या व्यवसायात असायचे. आमच्याकडचे जंगल घनदाट उंच व सागवानची झाडे जास्त. बहुतेकांचा मोठा घेर असायचा. त्या झाडांना सर्वत्र फार डिमांड असे.

आमच्या सोबत इतर अनेक व्यावसायिक मित्र सुध्दा असायचे. मला त्याबद्दल सांगायला लाज वाटते. जंगल-तोड, डिफॉरेस्टेशनचा हा व्यवसाय आपल्या स्वार्थासाठी करायचा. हा अमानुष व्यवसाय, जगबुडीचा व्यापार झाला. ती मंडळी सरकारी ठेका व त्यासाठी बोलणी करण्यास येत असत. ऑक्शनमध्ये आपापल्या किंमती बोलून सरकारकडून फॉरेस्ट मध्ये सागवानची झाडं कापण्यासाठी मंजुरी मिळवायची. आमचेच आप्त सध्याच्या भारतीय पाणीटंचाई व जंगल तुटवड्याला कारणीभूत आहेत हे सांगायला लाज वाटते.

जंगलातील विशिष्ट नोंद केलेली झाडं कापून तिथल्या तिथेच दहा ते बारा फूट लांबीचे लॉग कापून प्रत्येकीवर मंजुरीनुसार आपापल्या कंपनीच्या नांवाचा शिक्का मारायचा, व ते सर्व मालवाहू ट्रक्स भरून सिरोंचा विभागांतून बल्लारशाह गांवातील आमच्याच मालकीच्या जागेत डिस्प्लेसाठी रचून ठेवायचे. उरलेली सेकंड रेटची लांकडं. तेथूनच वीस-तीस लंबरचे ओंडके एकत्र बांधून रॅफ्ट तयार करून नदीत सोडायचे. आंध्रप्रदेश मधील राजमोहंद्री ह्या गांवी आमचे एक चुलते टिम्बर मर्चंट होते. ते त्या महाराष्ट्रीय लांकडांची विक्री करायचे. त्यांना चांगलाच डिमांड असेल. व मिळकत सुध्दा चांगलीच असावी. म्हणूनच अतिशय कष्ट सोसून, दोन तीन माणसांना महिना दोन महिने प्राणहिता व नंतर गोदावरी नदीच्या पात्रातून रॅफ्टींग करणे वगैरे एक बिकट शास्त्र आहे. आमच्याकडे व तेलंगणांत ह्या रॅफ्टना कट्टू असे नांव प्रचलित आहे.

हे रॅफ्ट दक्षिण वाहिनी प्रवाहांत सोडायचे. ते वाहत्या पाण्यासोबत पुढे पुढे दक्षिणेस जात. सोबतचे दोन नाममात्र नांवाडी फक्त ते रॅफ्ट काठांवर अडकून राहायला नको ह्याची काळजी घेत. प्राणहिता

दक्षिणेत कुठे तरी गोदावरी नदीत मिळते तेथे मात्र त्या नांवाड्यांना स्वत:चे कौशल्य पणावर लावावे लागे. एकाद्या वेळी रॅफ्ट मधील बांधलेले कांही ओंडके गांठी सोडून स्वतंत्र पणे वाहत गेलेत. मग मात्र नांवाड्यांची त्रेधा तिरपट होई. पोहून ती लांकडं पुन्हा व्यवस्थित बांधावी लागत. कांही ओंडके दूर वाहून दुर्मिळ व्हायचे. शोधाशोध करण्यांत वेळ जायचा. पुढचा मार्ग थोडा सोपा असला तरी, फायनल डेस्टिनेशन वर योग्य नदीच्या किनाऱ्यावर रॅफ्ट व्यवस्थित लावणे. हे महाकठींण. नांवाड्यांना हे कठीणच. पण...... तरीही...

ते सुध्दा रोमांचित व साहसी प्रसंग असावेत. अशी माझी भ्रामक कल्पना. ते अनुभव सुध्दा घेण्याची माझी तयारी होती.

मला ह्या असल्या कट्टूवरच कांही दिवस रात्र घालवायची इच्छा असल्याचे मी माझ्या भावंडांना बोलून दाखविले. सर्वांनी मला वेड्यांत काढले. रात्री चांदण्यात उघड्या ओंडक्यावर तारे बघत झोपेत डुलक्या द्यायचे स्वप्न मी रंगवित होतो. हे स्वप्न कधी साकार होईल, ? मी संधी शोधत होतो. पण माझी प्रकृतीने दगा दिला. तसा मी जन्मत:च ठेंगणा, हडकुळा, रोगट दिसतो. तसा माझा रंग ही सांवळा-काळ्यांतच मोडतो. सर्वांनांच माझ्या प्रकृतीची काळजी वाटे. हे मला थोडे अवास्तव वाटे.

उन्हाळ्याची सुटी लागली व दोन महिने अहेरी किंवा मामाच्या गांवी. वाटलं इतर दोन तीन कट्टू हांकणाऱ्यांसोबत आपण कांही दिवस घालवावे. निसर्गाशी जवळीक साधावी. अन्, मनाची तयारी पक्की झाली. त्या वर्षी मी सातवीत असेन. तसा मी स्वावलंबी, स्वत:ची काळजी घेऊ शकेन ह्याची मला खात्री वाटली. परंतु इतर कुणालाही त्यात तत्थ्य वाटेना, नाविकांना माझी अडचण नको होती. व माझे स्वप्न अपूरेंच राहिले.

वडिलांनी मात्र मी कॉलेजात शिक्षणाच्या दिवसांत असतांना हे असले साहसी, धाडसी अनुभव घेण्यस परवानगी दिली. व माझे स्वप्न अपूर्ण राहिले त्याच्या पूर्ती करीता तरी मला कॉलेज शिक्षण घेणे आवश्यक झाले.

गवर्नमेंट सायन्स कॉलेज नागपूर १९५३, दिवाळी.

मी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. अन् त्याच वेळी नॅशनल कॅडेट कोअर मध्ये नांव नोंदविले. ह्याचे मुख्य कारण, ह्या सर्व एन सी सी मुलांना इंग्रजी विषय घ्यायची आवश्यकता नसे. व मला त्याचेच अट्रॅक्शन. इंग्रजी भाषा मला नकोच होती. दर रविवारी कस्तरचंद पार्क मध्ये ड्रिल असे. नागपूर किल्ल्याच्या आंत मस्त नाश्ता व चहा असे. बऱ्याच नवीन ओळखी झाल्या. नवनवीन मित्र लाभले.

कांही धाडसी व साहसी उपद्व्याप करुं इच्छिणाऱ्यांचा एक ग्रुप तयार झाला. स्वप्नपूर्तीचे दिवस जवळच येऊन ठेपल्याची लक्षणं दिसली.

दिवाळीत सुटीचा एक महिना, स्वतंत्र भारताचा भविष्य घडविण्यास, द्यायला स्वयंसेवक हवे होते. एन सी सी ने आम्हाला पाचारण केले. मला अशी संधी हवी होती. अमरावती जिल्ह्यामधील अरवलीच्या जंगलांत मेळघाट जवळ एन सी सी चा कँप ठरला. चिखलधरा नदीत वाळूनी भरलेल्या बॅगा रचायच्या व वरचे वाहते पाणी थोपवायचे, असा सरकारचा विचार. त्यासाठी कैक लक्षावधी करोडोंनी रिकाम्या गोणपाटाच्या पिशव्या नदीच्या कांठावर (बीच) ठेवण्यात आल्या. प्रत्येक ग्रुपने ती पिशवी पात्रातील वाळूनी भरायची. व तो भार उचलून जवळच्या ट्रक मध्ये रचायचा. असले अति ताकदीचे, श्रमाचे व बोअरिंग काम होते. त्यांत साहस वा धाडस मुळीच नव्हते. दुसरीकडे दूर कुठेतरी नदीचे पाणी अडवून पात्र बदलण्याचे काम चालले होते. त्यासाठी वेगळ्या टीमची नेमणूक केली होती.

पण, एक ग्रुप स्पिरीट व मैत्री जमली होती. अगदी हिरीरीने नाचत, गात, पैजा लावून काम करायचो. व फावल्या वेळी व सायंकाळी खूप सारे मनोरंजनाचे कार्यक्रम असायचे. बरेचदा परत आपल्याच घरची दिवाळी आठवे. तरीही परतीचे वेध लागले असायचे. एकदा स्वयंसेवकसाठी नोंदणी झाली. व नंतर ह्यातून सुटका नाही. एक आमच्या बरोबरचा कॅडेट अंधाऱ्या मध्यरात्री जंगलातून पळून गेला. अर्थात एका मिलिटरी ट्रकने त्याला अमरावती गांवांत पोंचवले म्हणून बरे. त्या काळांत तेथे बरेचदा वाघ शिकारीच्या शोधांत भर रस्त्यावर भटकायचे. त्याला वाघाची भिती नसावी. पण आम्ही इतर सर्वजण कायद्याने बांधलेले होतो. तसा तो पळपुटा आम्हां सर्वांत जास्त धाडसी आहे. आम्ही मात्र बंधनात बांधले गेलो. अश्याच अमेरिकन सरकारी कागदांवर सह्या केल्यामुळे मला माझ्या इच्छेविरुद्ध डेझर्ट स्टॉर्म १९९१ च्या युध्दावर जावे लागले व सौदी अरेबिया च्या वाळवंटात रखडावे लागले.

आम्हाला खायला भरपूर विविध पदार्थ असायचे. परंतु मनसोक्त आंघोळ होत नसे. अर्धी बादली कोमट पाणी पुरत नसे. मला भरपूर वाहत्या पाण्यांत डुबकी मारायचे होते. मी विचार केला, ज्याअर्थी सरकारी यंत्रणा नदीचा पात्र अडवून बांद घालून पाणी अडविण्याचा विचार आहे. त्याअर्थी कुठेतरी पाणी मुरत असेलच. आम्ही एकदोन मित्र वेगवेगळ्या दिशेने फिरायला गेलो. दुसऱ्याच दिवशी पडत्या पाण्याच्या दिशेने पहाड ओलांडून जंगलांत दूर आंत गेलो. वाघाची भिती मनांत शिवली सुध्दा नाही. दोन फर्लांग आंत दाट जंगलात याच पहाडाच्या कडेवरून १०० फूट खाली दगडावर पाणी कोसळत होते. दगडावरून ते पाणी नदीच्या वाहत्या पाण्यांत मिसळत होते.

वाह, वाह, अगदी प्रायवेट धबधबा. ताबडतोब अंगावरचे सर्व कपडे झाडावर फेकून दिले. व मनसोक्त

आम्ही सर्व मित्र ओळीने धबधब्याच्या कोसळत्या पाण्याखाली उभे ठाकलो. त्या खडकावरून ते वाहते पाणी बाजूनेच वाहणाऱ्या संथ पाण्यांत मिसळत होते. पाय घसरुन नदीत बुडण्याची शक्यता फार होती. आम्ही तशी काळजी घेतली. खडकाचा निमुळता भाग व नदी किनाऱ्यालगतचा भाग टाळून एकमेकांना सोबत देत मस्तकावर पाण्याचा फोर्स सांभाळला. भगवान शंकरासारखा. हर हर महादेव, शंभो, ओम नम: शिवाय. जय जय जलप्रपात !

फार बरं वाटलं, सगळा शीण नष्ट झाला. दुसऱ्या दिवशीपासून त्या ठिकाणी रोजच हजेरी लावत असूं. परंतु लौकरच इतरांना सुगावा लागला. इतर सोल्जर मंडळींची गर्दी होऊ लागली. धबधब्याच्या धारेखाली स्वतंत्रपणे उभे राहायला मनसोक्त वेळ मिळत नसे. आतां ती धार प्रायव्हेट राहिली नाही. परंतु "ये भी कुछ कम नही"

नंतरचे उरलेले दिवस, दुपारी, सायंकाळी आमचा हा प्रायव्हेट जलप्रपात, हा अनामिक धबधबा आमच्या मित्रमंडळींसाठी व भेटीगांठीकरिता पॉप्युलर कट्टा झाला.

पुढे तो बांध टिकला किंवा नाही व आमचे महिन्याभराचे श्रम स्वतंत्र भारताच्या उपयोगी पडले (किंवा नाही), ह्याची दखल घेतली नाही व त्याची कसलीच बातमी प्रकाशित झाल्याचे दिसले नाही.

महिन्यानंतर मी अहेरीला घरी गेलो. उरलेली दिवाळी साजरी केली. एन सी सी कँप मध्ये माझे वजन वाढले होते. रंग आणखी काळा झाला होता. अंगावर खाजेचे चट्टे पडले होते. सर्व मद्दीवार कुटुंबियांना माझी काळजी वाटली. माझ्या वडिलांनी कधी नव्हे तसे लाड केले.

मी मनांतून खूप समाधानी व आनंदी होतो. व जलप्रपाताचा पहिला अनुभव मला सतत आठवणीत राहील.

(क्रमश:)

**डॉक्टर गंगाधर मद्दीवार,**
बॅनर केन्टकी.